ePaper

नेताऱ्याहूंना मोठा धक्का; राष्ट्राध्यक्षांकडून आयसेनकोट यांना सत्तास्थापनेचं निमंत्रण!



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™



WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 08 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

मध्यावधी निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचा मोठा पराभव, शेअर बाजारालाही फटका

ट्रम्प यांचा 'पॉवरफुल' पलटवार!

महाईन्यूज । वॉशिंग्टन

अमेरिकेच्या राजकारणात मध्यावधी निवडणुकीच्या निकालांनी मोठी उलथापालथ घडवून आणली आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षाला या निवडणुकीत मोठा राजकीय धक्का बसला असून, डेमोक्रॅटिक पक्षाने अमेरिकन काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांत भक्कम बहुमत मिळवल्याचे वृत्त आहे. या निकालामुळे ट्रम्प यांच्या नेतृत्वावर आणि त्यांच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहे. मात्र, या पराभवामुळे खचून न जाता ट्रम्प यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. 'काळजी करू नका, आम्ही पूर्वीपेक्षा अधिक भव्य आणि शक्तिशाली रूपात पुनरागमन करू,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. ट्रुथ सोशल या समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमुळे अमेरिकेच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे.



अमेरिकेतील टेक्सास, साउथ कॅरोलिना, कॅन्सस आणि ओहायो यांसारख्या महत्त्वाच्या राज्यांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाला मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे वृत्त आहे. विशेष म्हणजे, रिपब्लिकन पक्षाचे पारंपरिक प्रभावक्षेत्र मानल्या जाणाऱ्या भागांमध्येही डेमोक्रॅटिक पक्षाने मुसंडी मारली. त्यामुळे ट्रम्प यांच्या लोकप्रियतेबाबत आणि त्यांच्या प्रशासनाच्या कामगिरीबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. या निकालांकडे केवळ स्थानिक राजकीय बदल म्हणून न पाहता, अमेरिकेच्या आगामी राजकीय वाटचालीचे संकेत म्हणूनही पाहिले जात आहे.

रिपब्लिकन पक्षाच्या या कामगिरीमागे अमेरिकेतील वाढती महागाई, राहणीमानाचा वाढता खर्च आणि ट्रम्प प्रशासनाच्या परराष्ट्र धोरणाबाबत असलेली नाराजी ही प्रमुख कारणे असल्याचे राजकीय विश्लेषण केले जात आहे. सर्वसामान्य अमेरिकन नागरिकांसाठी दैनंदिन जीवनाचा खर्च वाढत असल्याने सरकारच्या आर्थिक धोरणांबाबत असंतोष निर्माण झाल्याचे मानले जाते.

याशिवाय, ट्रम्प यांनी लागू केलेल्या आयात शुल्काच्या धोरणामुळेही व्यापार आणि बाजारपेठेवर परिणाम झाल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, इराणविरोधात सुरू असलेल्या युद्धामुळे इंधनाच्या किमती वाढल्याचा मुद्दाही निवडणुकीत महत्त्वाचा ठरल्याचे सांगितले जात आहे. इंधन महागल्याने वाहतूक, उत्पादन आणि दैनंदिन वस्तूंच्या किमतींवर परिणाम होतो. त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये सरकारविरोधी भावना वाढल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

निवडणुकीतील निकालानंतर अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनीही रिपब्लिकन पक्षाच्या कामगिरीबाबत प्रतिक्रिया दिली. इराणसोबत सुरू असलेले युद्ध हे पक्षाच्या पराभवामागील महत्त्वाचे कारण असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे, व्हान्स यांच्या या विधानाला ट्रम्प यांनीही बहुतांशी सहमती दर्शवली आहे. त्यामुळे इराणविषयक धोरणाचा अमेरिकेतील अंतर्गत राजकारणावर किती परिणाम झाला, याबाबत चर्चा अधिक तीव्र झाली आहे.

पुढील राजकीय वाटचाल महत्त्वाची

मध्यावधी निवडणुकीतील निकाल हा ट्रम्प प्रशासनासाठी महत्त्वाचा राजकीय इशारा मानला जात आहे. दोन्ही सभागृहांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाचे बळ वाढल्यास ट्रम्प यांच्या आगामी धोरणांना संसदीय पातळीवर विरोधाचा सामना करावा लागू शकतो. कायदे मंजूर करणे, अर्थसंकल्पीय निर्णय घेणे आणि प्रशासनाच्या धोरणांना पाठिंबा मिळवणे यासाठी त्यांना अधिक राजकीय कसरत करावी लागू शकते. दुसरीकडे, डेमोक्रॅटिक पक्षासाठी हा निकाल आगामी राजकीय रणनीती अधिक आक्रमकपणे राबवण्याची संधी ठरू शकतो. मतदारांनी दिलेला कौल लक्षात घेऊन ट्रम्प प्रशासनाला आपल्या धोरणांचा फेरविचार करावा लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

ट्रम्प यांची पोस्ट चर्चेत

निवडणुकीतील निकालानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर पोस्ट शेअर करत आपली भूमिका स्पष्ट केली. निवडणुकीच्या निकालांचा अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर आणि विशेषतः शेअर बाजारावर नकारात्मक परिणाम झाल्याचा दावा त्यांनी केला. त्यांच्या मते, या निकालांमुळे अमेरिकेच्या बाजारपेठेला मोठा फटका बसला असून, शेअर बाजाराचे मूल्य एका दिवसात तीन ट्रिलियन डॉलर्सच्या खाली घसरले. मात्र, या परिस्थितीवर चिंता व्यक्त करण्याऐवजी ट्रम्प यांनी समर्थकांना धीर देण्याचा प्रयत्न केला. 'काळजी करू नका. आम्ही पुन्हा जोरदार पुनरागमन करू आणि तेही पूर्वीपेक्षा अधिक भव्य व शक्तिशाली स्वरूपात,' अशा आशयाचे विधान त्यांनी केले. त्यांच्या या प्रतिक्रियेतून पराभवानंतरही राजकीय लढाई सुरू ठेवण्याचा निर्धार दिसून येतो. तसेच, त्यांनी डेमोक्रॅटिक पक्षावरही निशाणा साधला आहे.

माजी उपमहापौरांना महापालिकेत नो एन्ट्री!

महिला कर्मचाऱ्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप; प्रशासनाकडून प्रवेशबंदीची कारवाई

महाईन्यूज । पुणे

पुणे महापालिकेचा कारभार गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळ्या पद्धतीने चर्चेत येत आहे. कामानिमित्त महापालिकेत आलेल्या एका माननीयाने एका महिला कर्मचाऱ्याबरोबर गैरवर्तन केल्याचा प्रकार समोर आला आहे. महापालिकेच्या नगरसचिव विभागातील महिला कर्मचाऱ्याशी उपमहापौर पदावर काम करणाऱ्या व्यक्तीने गैरवर्तन केले. उपमहापौरांनी गैरवर्तन केल्याचा प्रकार संबंधित महिलेने महापालिकेच्या विशाखा समितीकडे तक्रार दाखल केल्यानंतर उघड झाला. त्यानंतर महापालिका प्रशासनाने संबंधित माजी उपहापौरांना महापालिका आवारात येण्यास बंदी घातली आहे.



स्थायी समितीच्या बैठकीच्या दिवशी हा प्रकार घडल्याचे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. नगरसचिव विभागातील अनेक कर्मचारी, अधिकारी बैठकीच्या ठिकाणी उपस्थित होते. जेवणाच्या सुटीत काही कर्मचारी बाहेर गेले. तक्रारदार महिला नगरसचिव कार्यालयात काम करत असताना माजी उपमहापौरपद तेथे आले. त्यांनी थेट संबंधित महिला कर्मचाऱ्याचा हात पकडला आणि गैरवर्तन केले.

तसेच, असभ्य भाषेत संवाद साधला. नगरसचिव कार्यालयात फारसे कर्मचारी नसताना हे माजी उपमहापौर तेथे आले होते. त्यावेळी ही महिला तेथे काम करत होती. कार्यालयात इतर कोणी कर्मचारी नसल्याचे पाहून त्यांनी या महिलेजवळ जाऊन लगड करण्याचा प्रयत्न केला. तिचा हात पकडला. तिने त्यासाठी विरोध करताच तिला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली.

या प्रकारानंतर घाबरलेल्या महिलेने माजी उपमहापौरांच्या तावडीतून स्वतःची सुटका करून घेऊन घडलेला प्रसंग वरिष्ठांच्या कानावर घातला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित महिला कर्मचाऱ्याला धीर दिला. अचानकपणे झालेल्या या प्रकाराची जोरदार चर्चा महापालिकेत सुरू होती. महापालिकेत पदाधिकारी म्हणून काम केलेल्या व्यक्तींकडून असे प्रकार घडत असेल तर दाद मागायची तर कोणाकडे असा प्रश्न महापालिकेतील कर्मचाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित महिला कर्मचाऱ्याने महापालिकेच्या विशाखा समितीकडे तक्रार दिली. 'तक्रार आली असून, त्यावर योग्य ती कारवाई केली जाईल,' असे महापालिकेच्या विशाखा समितीच्या अध्यक्ष आणि विधी सल्लागार ॲड. निशा चव्हाण यांनी सांगितले.

महापालिकेचे सुरक्षा अधिकारी राकेश विटकर म्हणाले, 'तक्रारदार महिलेवर कोणताही दबाव येऊ नये आणि पुराव्यांशी छेडछाड होऊ नये यासाठी ज्या व्यक्तीच्या विरोधात तक्रार करण्यात आली आहे, त्यांना पुढील आदेशापर्यंत पुणे महापालिकेच्या आवारात प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली आहे.' यापुढील काळात असे प्रकार घडू नये, यासाठी आवश्यक ती काळजी घेतली जाणार असल्याचे विटकर यांनी स्पष्ट केले.

चाकणला स्वतंत्र महापालिका? अजितदादांनंतर सुनेत्रा पवार यांच्याकडूनही संकेत

महाईन्यूज । पुणे

औद्योगिक विस्तार, वाढती लोकसंख्या आणि वाहतूक कोंडीच्या विळख्यात सापडलेल्या चाकणला स्वतंत्र महानगरपालिकेचे स्वप्न लवकरच प्रत्यक्षात उतरण्याची चिन्हे आहेत. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चाकणसह हिंजवडी आणि मांजरी-फुरसुंगी-उरुळी देवाची येथे नवीन महानगरपालिका करण्याची घोषणा केली होती. आता उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनीही चाकण महानगरपालिका लवकरच जाहीर करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेची घोषणा नेमकी कधी होणार आणि प्रत्यक्ष निर्मितीची प्रक्रिया कधी सुरू होणार, याकडे चाकणकरांचे लक्ष लागले आहे.

चाकण एमआयडीसीतील वाहतूक कोंडी आणि औद्योगिक क्षेत्रातील समस्यांची पाहणी करण्यासाठी अजित पवार यांनी गेल्या वर्षी पहाटे दौरा केला होता. त्या वेळी नियोजनबद्ध विकासासाठी स्वतंत्र महानगरपालिका आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. 'कोणाला आवडो न आवडो, नजीकच्या काळात चाकण आणि या परिसरात महानगरपालिका करावी लागणार आहे. महानगरपालिका केल्याशिवाय अधिकचा निधी मिळणार नाही,' असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले होते.

चाकण एमआयडीसीमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्यांची गुंतवणूक असून, औद्योगिक विस्तार वेगाने सुरू आहे. मात्र, रस्ते, पाणीपुरवठा, सुरक्षा आणि दळणवळणाच्या सुविधांचा अभाव; तसेच गुंडगिरीच्या समस्येमुळे उद्योजकांमध्ये नाराजी वाढली होती. काही कंपन्यांनी येथून बाहेर पडण्याचा इशाराही दिला होता. त्यानंतर राज्य सरकारने हस्तक्षेप करून उद्योजकांशी चर्चा केली. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या नेतृत्वाखाली विविध यंत्रणांचा समन्वय साधण्यासाठी टास्क फोर्स स्थापन करण्यात आला. चाकण-हिंजवडीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सुमारे १,८०० कोटी रुपयांचा आराखडाही मंजूर करण्यात आला.



ठोस कृतीची चाकणकरांना अपेक्षा

महानगरपालिकेचे संकेत मिळाले असले, तरी तिची हद्द निश्चित करणे, समाविष्ट गावांची निवड, प्रशासकीय प्रक्रिया आणि सरकारची अधिकृत अधिसूचना या बाबी अद्याप स्पष्ट झालेल्या नाहीत. त्यामुळे राजकीय घोषणेनंतर प्रत्यक्ष महानगरपालिका अस्तित्वात येण्यासाठी किती कालावधी लागणार, हा प्रश्न कायम आहे.

सहकार्याची अपेक्षा

राजगुरुनगर येथील कार्यक्रमात सुनेत्रा पवार यांनी चाकणच्या समस्यांचा उल्लेख करून अजितदादांचे महानगरपालिकेचे स्वप्न पूर्ण करण्याचे संकेत दिले. 'चाकण आणि संलग्न परिसरासाठी चाकणकरांच्या मनात अपेक्षित असलेली चाकण महानगरपालिका आम्ही लवकरच जाहीर करणार आहोत,' असे त्यांनी स्पष्ट केले. औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या या परिसरात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी नागरिकांनीही सहकार्याची भूमिका घ्यावी, असे आवाहन सुनेत्रा पवार यांनी केले.

खरोशीतील गरजूंच्या घरात आनंदाची दिवाळी!

मुकुल माधव फाउंडेशन आणि भाजपच्या सहकार्याने गरजू कुटुंबांना अन्नधान्य किटचे वाटप | मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद; आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

दिवाळीच्या आनंदापासून समाजातील कोणतेही कुटुंब वंचित राहू नये, या भावनेतून भोसरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने खरोशी गावातील गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्यात आला. दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांना सणासुदीच्या काळात दिलासा मिळावा, यासाठी अन्नधान्याच्या किटचे वाटप करण्यात आले. पुण्यातील मुकुल माधव फाउंडेशन आणि भारतीय जनता पार्टी, भोसरी विधानसभा यांच्या सहकार्याने 'एक हात मदतीचा' हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत, आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या कुटुंबांच्या पाठीशी उभे राहण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिवाळीच्या तयारीत घरखर्चाची जुळवाजुळव करताना अनेक गरजू कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत त्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन अन्नधान्याच्या स्वरूपात मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. या मदतीमुळे संबंधित कुटुंबांच्या घरखर्चाला काही प्रमाणात हातभार लागला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या विचारातून प्रेरणा घेत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली समाजातील गरजू घटकांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून सामाजिक संस्था, भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आणि स्थानिक ग्रामस्थांनी एकत्र येत हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिले.

या उपक्रमाप्रसंगी खरोशी गावच्या सरपंच रोहिणी लांघी, उपसरपंच गोरक्ष कौदरे, माजी सरपंच भोलेनाथ कौदरे, पोलीस पाटील नवनाथ कौदरे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते किसन कौदरे, राजाराम कौदरे, नेताजी लांघी, पंढरीनाथ शिर्के, नितीन कौदरे, बाळासाहेब शिर्के, सीमा कौदरे, सुजाता कौदरे यांच्यासह गावातील ग्रामस्थ, युवक आणि महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

तसेच, मुकुल माधव फाउंडेशन व उडान फाउंडेशनच्या वतीने डॉ. अजय चंदनवाले उपस्थित होते. भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस तथा माजी नगरसेवक विकास डोळस, भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष दिनेश यादव, मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे, रामदास कुटे, प्रमोद परदेशी, भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकारी ऋषिकेश भालेकर आणि प्रकाश चौधरी यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपक्रमात सहभाग घेतला.

दिवाळी म्हणजे केवळ आपल्या घरात दिवे लावण्याचा सण नाही, तर अडचणीत असलेल्या कुटुंबांच्या आयुष्यातही आनंदाचा प्रकाश निर्माण करण्याची संधी आहे. याच सामाजिक जाणिवेतून राबविण्यात आलेल्या उपक्रमाने गरजू कुटुंबांना मदतीचा आधार देण्याबरोबरच समाजातील परस्पर सहकार्य आणि माणुसकीची भावना अधोरेखित केली.

आर्थिक संकटात असलेल्या कुटुंबांच्या पाठीशी उभे राहणे ही केवळ सामाजिक संस्थांची जबाबदारी नसून लोकप्रतिनिधी आणि समाजातील प्रत्येक सक्षम घटकाचे कर्तव्य आहे. 'एक हात मदतीचा' या उपक्रमातून हीच भावना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा प्रयत्न करण्यात आला. सणासुदीच्या काळात गरजूंच्या चेहऱ्यावर समाधान निर्माण करण्यासाठी अशा सेवाभावी उपक्रमांची आवश्यकता असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

> "दिवाळी सगळ्यांची आहे. आपल्या घरात सणाची तयारी करताना अडचणीत असलेल्या कुटुंबांचाही विचार केला पाहिजे. खरोशीतील कुटुंबांना अन्नधान्य देऊन त्यांच्या घरखर्चाचा थोडा भार हलका करण्याचा प्रयत्न आम्ही केला. 'एक हात मदतीचा' ही भावना सणापुरती मर्यादित राहू नये. जेव्हा गरज असेल, तेव्हा लोकांच्या पाठीशी उभं राहणं, ही लोकप्रतिनिधी म्हणून माझी जबाबदारी आहे."
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.

आयुक्तांनी बेघरांसोबत साजरी केली मायेची दिवाळी!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

दिवाळीचा आनंद प्रत्येकाच्या आयुष्यात पोहोचावा, या संवेदनशील भावनेतून पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी 'सावली' निवारा केंद्रातील ७५ बेघर व निराधार व्यक्तींसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी लाभार्थ्यांसोबत दिवाळीचा फराळ केला, त्यांच्या सुख-दुःखाची आस्थेने विचारपूस केली आणि त्यांच्या जीवनप्रवासातील संघर्ष जाणून घेतला. आयुक्तांच्या या आपुलकीच्या भेटीमुळे निवारा केंद्रातील वातावरण भावूक झाले.



महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या माध्यमातून आणि 'रिअल लाइफ रिअल पीपल' या संस्थेच्या सहकार्याने 'सावली' निवारा केंद्र चालविण्यात येते. रस्त्यावर निराधार अवस्थेत आढळलेल्या, नातेवाईकांपासून दुरावलेल्या तसेच मानसिक व शारीरिक आजारांनी त्रस्त असलेल्या व्यक्तींना या केंद्रात सुरक्षित निवारा, अन्न, औषधोपचार आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. अनेक निराधार व्यक्तींसाठी हे केंद्र केवळ निवाऱ्याचे ठिकाण न राहता नव्या कुटुंबाचा आधार ठरले आहे.

दिवाळीनिमित्त केंद्राला भेट दिल्यानंतर आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी प्रत्येक लाभार्थ्याशी स्वतंत्रपणे संवाद साधला. तुम्ही येथे कसे आलात, तुमची काळजी कशी घेतली जाते, जेवण आणि औषधोपचार वेळेवर मिळतात का, काही अडचणी आहेत का, अशी विचारपूस त्यांनी केली. लाभार्थ्यांनी सांगितलेले आयुष्यातील संघर्षाचे प्रसंग ऐकून आयुक्त भावूक झाले. नाती दुरावलेल्या आणि आयुष्याच्या प्रवासात एकाकी पडलेल्या व्यक्तींना 'सावली'च्या माध्यमातून मिळणारा आधार पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

केंद्रातील कर्मचाऱ्यांकडून लाभार्थ्यांची घेतली जाणारी काळजी, त्यांना दिली जाणारी सन्मानाची वागणूक आणि निर्माण केलेले आपुलकीचे वातावरण याचेही आयुक्तांनी कौतुक केले. यावेळी त्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून केंद्राच्या कामकाजाची, उपलब्ध सुविधांची आणि भेडसावणाऱ्या समस्यांची माहिती घेतली. संस्थेच्या स्थापत्यविषयक अडचणी जाणून घेत त्यावर आवश्यक उपाययोजना करण्यासाठी महापालिका अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.


यावेळी उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, रिअल लाइफ रिअल पीपल संस्थेचे एम. ए. हुसैन, व्यवस्थापक गौतम थोरात, समाजसेवक ॲग्नस फ्रान्सिस आदी उपस्थित होते.

> "सावली निवारा केंद्र हा समाजातील निराधार, बेघर आणि वंचित व्यक्तींना आधार देणारा अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. दिवाळीसारखा आनंदाचा सण या माता-पित्यांसोबत साजरा करताना त्यांच्या भावना जाणून घेता आल्या. प्रत्येक व्यक्तीला अन्न, वस्त्र आणि निवाऱ्यासोबतच प्रेम, आपुलकी आणि सन्मानाची वागणूक मिळणेही महत्त्वाचे आहे. केंद्रातील लाभार्थ्यांची काळजी घेणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. संस्थेच्या स्थापत्यविषयक समस्या जाणून घेतल्या असून त्यावर आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत."
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

भूमिका

महाडचा सत्याग्रह; समतेच्या लढ्याची शताब्दी!

भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय विषमता, अस्पृश्यता आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेला संघर्ष हा आधुनिक भारताच्या इतिहासातील क्रांतिकारी अध्याय आहे. २० मार्च १९२७ रोजी महाड येथे झालेला चवदार तळ्याचा सत्याग्रह हा केवळ सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी पिण्याचा अधिकार मिळविण्यासाठी नव्हता.



तर माणूस म्हणून सन्मानाने जगण्याच्या हक्कासाठी केलेला ऐतिहासिक लढा होता. २० मार्च २०२७ रोजी या सत्याग्रहाला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. या शताब्दीच्या निमित्ताने त्या संघर्षाचे स्मरण करण्याबरोबरच आजच्या सामाजिक वास्तवाचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे.

१९२३ मध्ये मुंबई विधान परिषदेने संमत केलेल्या बोले ठरावानुसार सार्वजनिक पाणवठे, विहिरी आणि अन्य सार्वजनिक सुविधांचा वापर सर्व जातींना करण्याचा अधिकार देण्यात आला होता. महाड नगरपालिकेनेही हा ठराव स्वीकारला; मात्र, उच्चवर्णीयांच्या विरोधामुळे प्रत्यक्षात दलितांना चवदार तळ्याचे पाणी वापरता येत नव्हते. या अन्यायाविरुद्ध बाबासाहेबांनी २० मार्च १९२७ रोजी हजारो अनुयायांसह सत्याग्रह केला आणि तळ्यातील पाणी प्राशन करून समानतेच्या लढ्याला नवे बळ दिले.

या कृतीला सनातनी शक्तींनी तीव्र विरोध केला. तळ्याचे कथित शुद्धीकरण करण्यात आले. त्यानंतर डिसेंबर १९२७ मध्ये बाबासाहेबांनी दुसरा सत्याग्रह आयोजित करून मनुस्मृतीचे जाहीर दहन केले. जातीय विषमता आणि अस्पृश्यतेला धार्मिक अधिष्ठान देणाऱ्या व्यवस्थेविरुद्धचा हा ठाम वैचारिक एल्गार होता. अखेर १७ मार्च १९३७ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने दलितांना चवदार तळ्यात प्रवेशाचा अधिकार मान्य केला. हा विजय केवळ न्यायालयीन नव्हता, तर मानवी प्रतिष्ठेच्या संघर्षाचा विजय होता.

पुढे बाबासाहेबांनी जातिव्यवस्थेच्या मुळावरच प्रहार केला. 'ANNIHILATION OF CASTE' या ग्रंथातून त्यांनी जातिव्यवस्थेचे चिकित्सक विश्लेषण केले. येवला येथे धर्मांतराची घोषणा करून १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धम्माचा स्वीकार केला. त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि बंधुता हाच होता. भारतीय संविधानाने अनुच्छेद १५ द्वारे भेदभावाला प्रतिबंध केला, तर अनुच्छेद १७ द्वारे अस्पृश्यता नष्ट केली. तरीही आज जातीय अत्याचार आणि सामाजिक भेदभावाच्या घटना घडत आहेत. यावरून केवळ कायदे करून सामाजिक परिवर्तन घडत नाही, हे स्पष्ट होते. त्यासाठी मानसिकता, सामाजिक मूल्ये आणि परस्परांप्रती आदर बदलणे गरजेचे आहे.

चवदार तळ्याच्या सत्याग्रहाची शताब्दी ही केवळ ऐतिहासिक उत्सवाची संधी नाही. ती समताधिष्ठित समाजनिर्मितीच्या अपूर्ण स्वप्नाची जाणीव करून देणारी आहे. सामाजिक समता ही केवळ संविधानातील तरतूद न राहता प्रत्येकाच्या आचरणात उतरली पाहिजे. बाबासाहेबांच्या संघर्षाला खऱ्या अर्थाने अभिवादन करायचे असेल, तर जातिभेदमुक्त, न्याय्य आणि बंधुभावाने नटलेला समाज निर्माण करणे हीच काळाची गरज आहे.

प्रासंगिक »

जिद्दीचा विजय

एका गावात अनिकेत नावाचा तरुण राहत होता. त्याला जुन्या वस्तू गोळा करण्याचा छंद होता. एके दिवशी त्याला गावातील वाचनालयात जुनी पुस्तके आणि कागदपत्रे आवरता-ना एक नकाशा सापडला.

त्या नकाशावर गावातील जुन्या तलावाचा आराखडा काढलेला होता. त्याने तो नकाशा गावातील ज्येष्ठ नागरिकांना दाखवला. सुरुवा-तीला कोणीही त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही. मात्र, अनिकेतने हार मानली नाही. त्याने नकाशाचा अभ्यास केला आणि तलावाच्या जुन्या जागेची माहिती गोळा केली.

काही दिवसांनी ग्रामसभेत त्याने आपले निरीक्षण मांडले. त्याच्या माहितीच्या आधारे गा-वकऱ्यांनी त्या जागेची पाहणी केली. तिथे अनेक वर्षांपासून मातीखाली गाडलेला पाण्याचा जुना मार्ग आढळला. ग्रामपंचायतीने तो मार्ग स्वच्छ करण्याचे काम सुरू केले. पावसाळ्यात त्या मार्गातून पाणी तलावापर्यंत पोहोचू लागले.


गावातील लोकांना अनिकेतच्या जिद्दीचे कौतुक वाटले. त्याच्या एका प्रयत्नामुळे गावाला पाण्याचा नवा स्रोत मिळाला.

- तात्पर्य : स्वतःच्या विचारांवर विश्वास ठेवून चिकाटीने प्रयत्न केल्यास दुर्लक्षित संधीही उपयोगी ठरू शकते.

यश मिळविण्यासाठी गुणवत्ता, बुद्धिमत्ता आणि संधी महत्त्वाच्या असतात; मात्र, या सर्वांपेक्षा महत्त्वाचा असतो तो सातत्यपूर्ण प्रयत्नांचा ध्यास. जागतिक फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो याच्या यशस्वी कारकिर्दीमागेही हाच मूलमंत्र आहे.

यशाचं गुपित प्रेरणेत नाही, सातत्यात आहे!

रोजचा सराव, नियमित व्यायाम, कठोर मेहनत आणि स्वतःला अधिक सक्षम बनविण्याची जिद्द यामुळेच त्याने जागतिक क्रीडा क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्याच्या अनुभवातून यशस्वी होण्याची एक महत्त्वाची शिकवण मिळते, ती म्हणजे मनाची इच्छा असो वा नसो, आपले ध्येय गाठण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी सातत्याने करत राहणे.



आजच्या स्पर्धेच्या युगात अनेकांना झटपट यश हवे असते. मात्र, यशाचा प्रवास हा एका दिवसात पूर्ण होत नाही. त्यासाठी वर्षानुवर्षे मेहनत करावी लागते. रोनाल्डोच्या मते, रोज जिममध्ये जाण्याची किंवा व्यायाम करण्याची इच्छा प्रत्येक वेळी होत नाही; तरीही तो आपला दिनक्रम चुकवत नाही. कारण त्याला सातत्याचे महत्त्व माहीत आहे. केवळ गुणवत्ता असून चालत नाही, तर त्या गुणवत्तेला मेहनतीची जोड देणे आवश्यक असते. स्वतःला पूर्णपणे झोकून दिल्याशिवाय अपेक्षित यश मिळू शकत नाही.

यश मिळाल्यानंतरही स्वतःला सर्वोत्तम समजून थांबून चालत नाही. उलट, यशाच्या शिखरावर असतानाही स्वतःमधील कमतरता शोधून त्यावर काम करणे गरजेचे असते. नव्या खेळाडूंचे आव्हान स्वीकारताना स्वतःची तयारी अधिक भक्कम ठेवावी लागते. रोनाल्डो यासाठी शारीरिक क्षमतेबरोबरच मानसिक तयारीलाही महत्त्व देतो. मैदानावर स्वतःची कामगिरी उंचावण्यासोबतच सहकाऱ्यांना मदत करणे, संघभावना जपणे आणि परिस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल करणे, हेही यशाचे महत्त्वाचे पैलू आहेत. अपयश हा यशाच्या प्रवासातील अविभाज्य भाग आहे. पराभव झाल्यानंतर निराश होणे स्वाभाविक असले, तरी त्यात अडकून राहणे योग्य नाही. अपयशातून धडा घेऊन पुन्हा नव्या जोमाने कामाला लागणे आवश्यक आहे. रोनाल्डोच्या मते, कठीण प्रसंगांत माणूस सर्वाधिक शिकतो. त्यामुळे आव्हानांना घाबरण्याऐवजी त्यांचा स्वीकार केला पाहिजे.

खरे तर रोनाल्डोचे हे तत्त्वज्ञान केवळ फुटबॉलपुरते मर्यादित नाही. शिक्षण, नोकरी, व्यवसाय, कला किंवा कोणतेही क्षेत्र असो, यशासाठी सातत्य, शिस्त आणि मेहनत आवश्यक आहे. केवळ प्रेरणेच्या भरात सुरुवात करून उपयोग नाही; प्रेरणा नसतानाही आपले काम प्रामाणिकपणे सुरू ठेवण्याची वृत्ती महत्त्वाची आहे. कारण मोठे यश एका मोठ्या प्रयत्नातून नव्हे, तर रोजच्या छोट्या प्रयत्नांच्या संचयातून घडते. स्वतःवर विश्वास ठेवून सातत्याने प्रयत्न करणाऱ्यांसाठी यशाचा मार्ग नक्कीच खुला होतो.

।। अभंगवाणी ।।



शुकसनकादिकीं उभारिला बाहो ।
परिक्षितीला हो दिसां सातां ॥१॥

उठाउठी करी स्मरणाचा धांवा ।
धरवत देवा नाहीं धीर ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

मुख्यमंत्र्यांची दिवाळी शेतकऱ्यासोबत!

शेतातील विंधन विहिरींवरील बंदी १५ डिसेंबर पर्यंत शिथिल; मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

महाईन्यूज । नागपूर

सध्याची दुष्काळी स्थिती पाहता विशेष बाब म्हणून जिथे गरज आहे तिथे झाडे जगविण्यासाठी केवळ शेतीकामाकरीता विंधन विहिरींवरील बंदी येत्या 15 डिसेंबर पर्यंत उठविण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा येथे आज सकाळी मुख्यमंत्र्यांनी विविध ग्रामपंचायत सरपंचांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी शनिवारी या गावात मुक्काम करून येथेच दिवाळी साजरी केली. आज सकाळी पुढील दौऱ्यावर निघण्यापूर्वी त्यांनी तालुक्यातील लोकप्रतिनिधींशी संवाद साधला. यंदा दुष्काळामुळे जलसंकट असून, शेतातील पिके मातीमोल होण्याची भीती लोकप्रतिनिधींनी व्यक्त केली. त्यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विंधन विहिरींचे खोलीकरण किंवा नवीन विंधन विहिरी करणे यावरील बंदी उठविणे सरकारसाठी थोडे अडचणीचे आहे, मात्र विशेष बाब म्हणून हा निर्णय घेण्यात येत आहे. मात्र यासाठी शेतकऱ्यांना परवानगी घ्यावी लागेल तसेच बंदी उठविण्याचा निर्णय सरसकट नाही, झाडे जगविण्यासाठी आवश्यक तेथेच परवानगी असेल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. त्याचवेळी नागरिकांनी पाण्याची बचत तसेच पुनर्भरण करावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

या परिसरात मोठ्या प्रमाणात पशुधन आहे, मात्र पशू दवाखाने नाही, अशी व्यथा अनेक प्रतिनिधींनी मांडली. त्यावर गुरांच्या दवाखान्यांबाबत पाहणी करून लगेच निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले.

जलजीवन मिशनच्या कामांबाबत मुख्यमंत्री म्हणाले की, पुरेसे पैसे न मिळाल्याने काही कामे अपूर्ण आहेत, मात्र आता ती प्राधान्याने पूर्ण केली जात आहेत. जेथील कामे 75 टक्यांच्यावर पूर्ण झाली आहेत, तेथे तातडीने निधी उपलब्ध करून ती कामे पूर्ण केली जातील. अन्य ठिकाणची कामेही टप्प्यात पूर्ण केली जातील, असे याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

शेतातील पिकांचे वन्य प्राण्यांकडून होत असलेले नुकसान गंभीर आहे. त्यासाठी तार कुंपण योजना अधिक व्यापक करण्यात येईल. जंगलाला लागून असलेल्या शेतांना यात विशेष प्राधान्य देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जलसाठ्यामधील गाळ काढून ती माती शेतीत टाकण्याची कामे हाती घेण्यात आली असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

ब्लॅकमेल करणारांना तुरुंगात टाकणार

तालुक्यातील काही महिला सरपंचांनी पत्रकार असल्याचे सांगून पैशाची मागणी करण्यात येत असल्याची तक्रार मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. ब्लॅकमेल करून पैशाची मागणी केली जात असल्यास संबंधित व्यक्तीला तुरुंगात टाकण्यात येईल असेही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले. पोलिस विभागाने याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जास्त काळ भाजपसोबत राहू नका, रोहित पवारांची एकनाथ शिंदेंना विनंती

महाईन्यूज । सोलापूर

केंद्रात आणि राज्यात भाजपाकडून हिंदू खतरे में तर कधी संविधान खतरे में है म्हणतात.सरकार तुमचं आहे तरीही हेच संविधान बचाओ म्हणत आहेत. या सरकारचं डोकं सटकलं आहे असं म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस आमदार रोहित पवार यांनी सरकारवर टीका केली आहे. तसंच एकनाथ शिंदेंना विनंती केली आहे.





रोहित पवार म्हणाले एकनाथ शिंदेंना आम्ही अप्रत्यक्ष विनंती केली आहे. जास्त काळ भाजपासह राहू नका.आमच्या कुटुंबातील दुसऱ्या पक्षाचं काय चाललं हे त्यांचं त्यांनाच माहीत नाही असाही टोला रोहित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाला लगावला आहे. अक्कलकोट या ठिकाणी बोलत असताना रोहित पवारांनी हे वक्तव्य केलं आहे.

जे कोणी भाजपसोबत सत्तेत राहिलं त्यांचं नुकसान होणार असल्याचे मत रोहित पवारांनी व्यक्त केले.भाजपच्या कार्यकर्त्यांना सुद्धा AI डेटा सेंटर माहिती नाही. एक जण म्हणाला की १०० पवार आले तर AI डेटा सेंटर होणार. १०० कशाला एकटाच पवार तुम्हाला पुरेसा आहे असं रोहित पवार म्हणाले. इथल्या आमदाराचा एक मित्र आहे, सोलापूर शहरात त्याचा भागीदार आहे त्यामध्ये. मला तर संशय आहे की आमदारांची सुद्धा भागीदारी आहे. त्यामुळे आंदोलन लोकांसाठी होतं की स्वतःसाठी बघा असेही पवार म्हणाले. या तालुक्यात मोठ्या प्रमाणात ड्रग्स मिळतंय म्हणे. स्टिंगमध्ये गोळी घालून पितात, पालकमंत्र्यांची गोळी नाही असा टोलाही पवारांनी मंत्री जयकुमार गोरेंना लगावला. या सरकारला वेड लागलं आहे. आपली बॅट आपली मॅच असं करत आहे.

राज्य सरकारची शेतकरी कर्जमाफी योजना नसून ती कर्ज वसुली योजना असल्याची टीका रोहित पवारांनी सरकारवर केली. शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या वेळी संकटमोचक असणारे गिरीश महाजन आले आणि त्यांनी आश्वासन दिले, पण दोन-तीन महिने झाले. आश्वासनाची पूर्तता केली नाही. यंदाच्या वर्षी दोन लाख शेतकऱ्यांना कर्ज मिळालं आहे. हिवाळी अधिवेशनापर्यंत शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे असा इशारा रोहित पवारांना दिला आहे. सत्तेतील आमदार आणि नेते या मंचावर आले आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी ते मंचावर आले आहेत, त्यांचे स्वागत झालं पाहिजे. शिक्षकांच्या आंदोलनात आम्ही भाग घेतला त्यावेळेस टप्पा अनुदानाचा प्रश्न मार्गी लागला. पुणे येथील एमपीएससी आंदोलनात रोज ३० हजार विद्यार्थी आंदोलनात सहभागी होण्यासाठी येत होते. तलाठ्यासाठी ७० लाख रुपये दिल्यावर ते तुमचे काम कसे करणार. १८ दिवस आम्ही एमपीएससीचा प्रश्न सोडवण्यासाठी आंदोलन केलं आणि अहंकारी सरकारला ताळ्यावर आणलं असंही रोहित पवार म्हणाले.

FSSAI चा दणका; ८१ कोटींचा अन्नसाठा जप्त!

दोन महिन्यांत देशभरातील ५६ हजारांहून अधिक आस्थापनांची तपासणी

महाईन्यूज । नवी दिल्ली

सण-उत्सवाच्या काळात नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अन्नातील भेसळविरोधात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने मोठी धडक मोहीम राबवली आहे. गेल्या दोन महिन्यांत FSSAI ने राज्य अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या सहकार्याने देशभरात केलेल्या कारवाईत तब्बल ८१ कोटी ८० लाख रुपयांचा सुमारे ३,२७० मेट्रिक टन भेसळयुक्त व निकृष्ट अन्नपदार्थांचा साठा जप्त केला आहे. याचबरोबर नियम मोडणाऱ्या १,१०० हून अधिक व्यावसायिकांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.



FSSAI ने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर दिलेल्या माहितीनुसार, १ सप्टेंबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान देशभरातील अनेक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ५६,४३१ अन्न व्यवहार करणाऱ्या आस्थापनांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या मोहिमेदरम्यान अटींचे उल्लंघन करणाऱ्या १०,०४७ प्रतिष्ठानांना त्रुटी दूर करण्यासाठी सुधारणा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

मोहिमेदरम्यान प्राधिकरणाने एकूण ४३,९३९ अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी गोळा केले होते. यापैकी २४,६४८ नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी पूर्ण झाली असून, तब्बल २,२७३ नमुने सुरक्षा मानकांवर अयोग्य आढळले आहेत.

जप्त करण्यात आलेल्या साठ्यामध्ये प्रामुख्याने रोजच्या वापराचे व सण-उत्सवात मोठ्या प्रमाणात विकले जाणारे पदार्थ समाविष्ट आहेत:

खाद्यतेल, दूध, पनीर, तूप आणि मिठाई

बेकरी उत्पादने, चॉकलेट्स आणि आईस्क्रीम

नमकीन, पॅकेज्ड फूड आणि फेस्टिव्हल गिफ्ट हॅम्पर्स

"नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही. अन्न सुरक्षेचे उच्च दर्जाचे नियम पाळले जावेत, यासाठी ही धडक कारवाई करण्यात आली," असे प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे.

दिवाळी आणि इतर सणांच्या काळात बाजारात भेसळयुक्त, बनावट आणि आरोग्यास घातक अन्नपदार्थांची विक्री वाढते. ही शक्यता लक्षात घेऊन FSSAI ने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना निगराणी व धाडी वाढवण्याचे निर्देश दिले होते. आगामी काळातही राज्य अन्न सुरक्षा यंत्रणांच्या मदतीने अशीच कठोर तपासणी मोहीम सुरू राहील, असा इशारा FSSAI ने दिला आहे.

३१४ दुकाने सील

FSSAI ने कारवाईची व्याप्ती स्पष्ट करताना सांगितले की, निकृष्ट अन्नपदार्थ विकणाऱ्या आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५२ आस्थापनांचे परवाने कायमचे रद्द करण्यात आले आहेत. तसेच ३१४ दुकाने व कारखाने तत्काळ सील करण्यात आले असून, दोषी आढळलेल्या ४१० जणांवर न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

नेतान्याहूंना मोठा धक्का; राष्ट्राध्यक्षांकडून आयसेनकोट यांना सत्तास्थापनेचं निमंत्रण!

महाईन्यूज । इस्रायल

इस्रायलच्या राजकारणात रविवारी एक अभूतपूर्व राजकीय उलथापालथ झाली आहे. पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांना मोठा धक्का देत राष्ट्राध्यक्ष आयझॅक हर्झोग यांनी विरोधी पक्षाचे नेते आणि माजी लष्करप्रमुख गाडी आयसेनकोट यांना नवीन सरकार स्थापन करण्याचे अधिकृत निमंत्रण दिले आहे. राष्ट्राध्यक्ष भवनात रविवारी सायंकाळी पार पडणाऱ्या विशेष सोहळ्यात गाडी आयसेनकोट यांच्याकडे सत्तास्थापनेचा आदेश सोपवला जाईल. त्यानंतर त्यांना बहुमत सिद्ध करण्यासाठी २८ दिवसांची मुदत मिळेल. गरज भासल्यास राष्ट्राध्यक्ष ही मुदत आणखी १४ दिवसांनी वाढवू शकतात.



इस्रायलच्या १२० सदस्यांच्या संसदेमध्ये सत्तास्थापनेसाठी ६१ खासदारांच्या बहुमताची आवश्यकता असते. निवडणुकांमध्ये बिन्यामिन नेतान्याहू यांच्या 'लिकुड' पक्षाला सर्वाधिक २७ जागा मिळाल्या असल्या तरी, त्यांच्या आघाडीला केवळ ५३ जागांपर्यंतच मजल मारता आली.

दुसरीकडे, गाडी आयसेनकोट यांच्या 'याशार' पक्षाला २१ जागा मिळाल्या आहेत. मात्र, सत्तास्थापनेसाठी राष्ट्राध्यक्षांनी घेतलेल्या बैठकीत गाडी आयसेनकोट यांना तब्बल ६७ खासदारांचा पाठिंबा मिळाला, तर बिन्यामिन नेतान्याहू यांच्या बाजूने केवळ ४६ खासदार उभे राहिले. यामध्ये इस्रायलमधील अरब अल्पसंख्याक पक्षांच्या १९ खासदारांनी गाडी आयसेनकोट यांना दिलेल्या पाठिंब्याचा मोठा वाटा आहे.

गाडी आयसेनकोट यांना पहिली संधी मिळाली असली तरी बहुमताचा ६१ चा आकडा गाठणे त्यांच्यासाठी तितकेसे सोपे नसून, त्यांच्यासमोर अरब पक्षांच्या बाहेरील पाठिंब्यावर अल्पमताचे सरकार चालवणे, बिन्यामिन नेतान्याहूंचे पारंपरिक मित्र असलेल्या कट्टरपंथी पक्षांना सोबत घेणे किंवा नेतान्याहूंच्या लिकुड पक्षासोबत राष्ट्रीय महायुती स्थापन करणे असे तीन पर्याय उपलब्ध आहेत; परंतु आयसेनकोट यांनी कोणत्याही परिस्थितीत नेतान्याहूंसोबत सरकारमध्ये सहभागी न होण्याचा ठाम निर्णय जाहीर केला असून, त्यांनी पुढे केलेल्या ४ प्रमुख अटींमुळे आघाडीच्या चर्चा आणखी गुंतागुंतीच्या व अवघड ठरू शकतात.

गाडी आयसेनकोट यांना संधी मिळताच पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी राष्ट्रीय ऐक्याचे आवाहन करत अरब पक्षांच्या मदतीने सरकार स्थापन करण्याच्या प्रयत्नांवर कडक शब्दांत टीका केली.

"देशाचा विनाश पाहू इच्छिणाऱ्या आणि दहशतवादाचे समर्थन करणाऱ्या पक्षांच्या जोरावर सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न सुरू आहे," असा आरोप बिन्यामिन नेतान्याहू यांनी केला. अरब पक्षांच्या मदतीने बनलेले सरकार हमाससारख्या संकटाचा सामना करू शकत नाही, असा दावाही त्यांनी केला.

गाडी आयसेनकोट यांच्या प्रमुख ४ अटी:

1. इस्रायलला ज्यू, लोकशाही आणि समानतेचे राष्ट्र म्हणून मान्यता देणे.
2. स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यातील मूल्यांचा आदर करणे.
3. सर्व नागरिकांसाठी लष्करी वा राष्ट्रीय सेवा अनिवार्य करणे.
4. गाझामधील हमास ही दहशतवादी संघटना असल्याचे मानून तिचे अस्तित्व संपवण्यास पाठिंबा देणे.

कोण आहेत गाडी आयसेनकोट?

६६ वर्षांचे गाडी आयसेनकोट हे इस्रायलचे माजी लष्करप्रमुख आहेत. २०२२ मध्ये त्यांनी राजकारणात प्रवेश केला. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने केलेल्या हल्ल्यानंतर त्यांनी बिन्यामिन नेतान्याहू यांच्या युद्धकालीन मंत्रिमंडळात प्रवेश केला होता, परंतु नंतर मतभेदांमुळे ते विरोधी पक्षात परतले. या युद्धात त्यांच्या कुटुंबाने मोठी किंमत मोजली असून, गाझामधील कारवाईत त्यांचा एक मुलगा आणि दोन पुतणे शहीद झाले आहेत. लष्करी पार्श्वभूमी आणि सुरक्षेबाबतची स्पष्ट भूमिका यामुळेच त्यांना जनतेचा आणि इतर पक्षांचा मोठा पाठिंबा मिळत आहे.

‘जुमांजी : ओपन वर्ल्ड’चा थरार पुन्हा!


हॉलिवूड अभिनेता ड्वेन जॉन्सन याच्या लोकप्रिय ‘जुमांजी’ चित्रपट मालिकेतील आगामी चित्रपट ‘जुमांजी : ओपन वर्ल्ड’ची प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. या चित्रपटाचा नवा टेलर प्रदर्शित झाला असून, रहस्यमय जंगल, धाडसी साहस आणि गेमच्या दुनियेतील अनपेक्षित घटनांची झलक त्यातून पाहायला मिळते.
दिग्दर्शक जेक पॅस्डन यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटात वास्तविक जग आणि गेमचे काल्पनिक जग यांच्यातील सीमारेषा धूसर होताना दिसतात. गेममधील पात्रे वास्तविक जगात प्रवेश करू लागल्याने अनेक रोमांचक प्रसंग निर्माण होतात. या अनपेक्षित संघर्षामुळे कथेला कोणते वळण मिळणार, याची उत्सुकता चाहत्यांना लागली आहे. या चित्रपटात ड्वेन जॉन्सन, केविन हार्ट, जॅक ब्लॅक, पॅरेन गिलन आणि निक जोनास यांच्या प्रमुख भूमिका आहेत. जुमांजी चित्रपट मालिकेतील साहस आणि विनोदाची परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे.
1995 मध्ये रॉबिन विल्यम्स यांच्या अभिनयाने सजलेल्या मूळ ‘जुमांजी’ चित्रपटापासून या मालिकेचा प्रवास सुरू झाला. त्यानंतर ‘जुमांजी : वेलकम टू द जंगल’ (2017) आणि ‘जुमांजी : द नेक्स्ट लेव्हल’ (2019) या चित्रपटांनी प्रेक्षकांचे मनोरंजन केले. ‘जुमांजी : ओपन वर्ल्ड’ हा चित्रपट 25 डिसेंबर 2026 रोजी इंग्रजी, हिंदी, तमिळ आणि तेलुगू भाषांमध्ये भारतीय चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.





अदितीचा जलवा!

पंकज त्रिपाठी आणि अदिती राव हैदरी यांची मुख्य भूमिका असलेला चित्रपट ‘पारिवारिक मनुरंजन“चा टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे. चित्रपटाची कहाणी पारिवारिक आणि सामाजिक संबंधांच्या आसपास घुटमळणारी आहे. टीझर अत्यंत मजेशीर असून यात विनोदासोबत गंभीर विषयालाही स्पर्श करण्यात आला आहे. हा चित्रपट सोनी लिव या ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. सर्वसाधारणपणे गंभीर भूमिका साकारणाऱ्या पंकज त्रिपाठींची या चित्रपटातील भूमिका प्रेक्षकांना खळखळून हसविणार आहे. या चित्रपटाद्वारे अदिती आणि पंकज त्रिपाठी हे पहिल्यांदाच एकत्र दिसून येणार आहेत. टीझरमध्ये हेलेन (अदिती) रंजन दुबे (पंकज त्रिपाठी)च्या घराचे दार ठोठावते. दरवाजा उघडताच हेलेन आपण दिल्लीतून आल्याचे सांगते. ‘प्रॉपर्टी मॅनेजर आणि हाउसकीपरची आवश्यकता होती ना, त्याचसाठी मी आल्याचे ती रंजन दुबे यांना सांगत असल्याचे टीझरमध्ये दिसून येते. घरात दाखल होताच ‘इतके मोठे घर असून यात खूप काम असेल“ असे म्हणते. चौकशीत रंजन दुबे घरात एकटेच राहत असून त्यांचा विवाह झाला नसल्याचे तिला कळते. मग येथूनच हेलेन आणि रंजन दुबे यांच्यात जवळीक वाढते. तसेच हिंडणे फिरणे सुरू होते. दोघांची जवळीक कोणते वळण घेते हे चित्रपट पाहूनच कळू शकणार आहे.



राशीने शेअर केल्या सेटवरील आठवणी!

लोकप्रिय अभिनेत्री राशी खन्ना लवकरच अभिनेता अक्षय कुमारच्या ‘मौजा ही मौजा“ या आगामी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाले असून, राशीने सोशल मीडियावर सेटवरील काही खास क्षण शेअर करत आपला अनुभव सांगितला आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण तिच्यासाठी कामापेक्षा सुट्टीसारखे आनंददायी ठरल्याचे तिने म्हटले आहे. राशी खन्नाने इन्स्टाग्रामवर छायाचित्रांची मालिका पोस्ट केली. त्यासोबत लिहिलेल्या खास संदेशातून तिने चित्रपटाच्या सेटवरील धमाल आठवणींना उजाळा दिला. ‘प्रत्येक चित्रपटाची एक कथा पडद्यावर असते; पण कधी कधी खरा आनंद पॅमेरा सुरू नसताना मिळतो,“ अशा आशयाच्या शब्दांत तिने आपला अनुभव व्यक्त केला. ‘मौजा ही मौजा“च्या सेटवर काम करताना अजिबात कंटाळा आला नाही, असे राशीने सांगितले. सतत सुरू असलेली मस्करी, लुडोचे डाव, डंब शराड्स हा खेळ, पॅरमच्या स्पर्धा आणि सेटवरील मजामस्ती यामुळे चित्रीकरणाचा प्रत्येक दिवस खास ठरला. चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाले असले, तरी सेटवरील या आठवणी दीर्घकाळ चेहऱ्यावर हसू आणत राहतील, अशी भावनाही तिने व्यक्त केली. हा प्रवास आनंददायी केल्याबद्दल राशीने अभिनेता अक्षय कुमार, अभिनेत्री विद्या बालन आणि दिग्दर्शक अनीस बज्मी यांचे आभार मानले. संपूर्ण टीमसोबत काम करताना मिळालेला अनुभव तिच्यासाठी संस्मरणीय ठरल्याचे तिने नमूद केले. चित्रपटाच्या कथानकाबाबत आणि प्रदर्शनाच्या तारखेबाबत अधिकृत तपशील समोर येण्याची प्रेक्षकांना प्रतीक्षा आहे.

रोमहर्षक लढतीत भारताचा पराभव

झहूरच्या नाबाद शतकाच्या जोरावर पाकिस्तान U19 संघाचा ३ गडी राखून विजय

महाईन्यूज । नवी दिल्ली

१९ वर्षांखालील आशिया चषक (ACC U19 Asia Cup) स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यात खेळल्या गेलेल्या अत्यंत अटीतटीच्या व थरारक सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा धक्का सहन करावा लागला आहे. या प्रतिष्ठेच्या हाय-व्होल्टेज लढतीत पाकिस्तानच्या १९ वर्षांखालील संघाने ३ गडी राखून विजय मिळवला.



पाकिस्तानच्या या विजयात यष्टीरक्षक-फलंदाज हमझा झहूर याचे झुंजार शतक निर्णायक ठरले. भारतीय गोलंदाजांनी सामन्याच्या प्रारंभी अत्यंत भेदक मारा करत पाकिस्तानवर दबाव निर्माण केला होता; मात्र मधल्या फळीतील फलंदाजांच्या अभेद्य भागीदाऱ्यांच्या जोरावर पाकिस्तानने अखेर विजयश्री खेचून आणली. हमझा झहूरने नाबाद १०० धावांची खेळी साकारली. त्याने आपल्या या शतकी खेळीत १० चौकार आणि ३ उत्तुंग षटकार लगावले.

तत्पूर्वी, भारतीय संघाने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली; मात्र पाकिस्तानच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर भारतीय डावाला गळती लागली आणि संपूर्ण संघ ४६.३ षटकांत २०८ धावांवर गारद झाला. भारताकडून युवा फलंदाज अर्जुन राजपूतने एकाकी झुंज देत जबरदस्त शतक झळकावले. अर्जुनने पाकिस्तानच्या गोलंदाजांचा समाचार घेत केवळ ८५ चेंडूंत ११ चौकार व ५ षटकारांच्या मदतीने १०७ धावांची तडाखेबंद खेळी उभारली. पाकिस्तानतर्फे गोलंदाजीत रिझवानउल्लाह आणि निकाब शफीक यांनी अचूक मारा करत प्रत्येकी ३ फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला.

भारताने दिलेल्या २०९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात खराब झाली. भारतीय गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर अवघ्या १५ षटकांत ६१ धावांवर पाकिस्तानचा निम्मा संघ तंबूत परतला होता. मात्र, अत्यंत बिकट परिस्थितीत हमझा झहूरने हसनैन अब्बास डार याच्या साथीने संयमी फलंदाजी करत सामन्याचे चित्र पूर्णपणे पालटून टाकले.

या जोडीने सहाव्या गड्यासाठी १०७ धावांची बहुमूल्य शतकी भागीदारी रचून भारतीय संघाला सामन्यातून निष्प्रभ केले. हसनैनच्या रूपाने पाकिस्तानची आणखी एक जोडी फुटली आणि त्यानंतर त्यांचे आणखी दोन गडी बाद झाले; मात्र तोपर्यंत सामना भारताच्या हातून पूर्णपणे निसटला होता. हमझाने अखेरपर्यंत संयम न गमावता संघाला विजय मिळवून दिला.

शमीच्या कसोटी निवृत्तीवर रवी शास्त्री नाराज

विशेष म्हणजे, १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाचा पाकिस्तानविरुद्धचा हा सलग दुसरा पराभव ठरला आहे. याआधी २०२५ च्या १९ वर्षांखालील आशिया चषकाच्या अंतिम फेरीतही पाकिस्तानने भारताचा तब्बल १९१ धावांच्या मोठ्या फरकाने मात दिली होती. त्या सामन्यात पाकिस्तानने उभारत केलेल्या ३४७/८ धावांच्या आव्हानापुढे भारताचा डाव अवघ्या २६.२ षटकांत १५६ धावांवर आटोपला होता. या पराभवामुळे भारताच्या युवा संघाच्या कामगिरीवर आणि रणनीतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. विशेषतः पाकिस्तानविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यांमध्ये भारतीय फलंदाजांना मोठी धावसंख्या उभारण्यात अपयश येत असल्याचे चित्र समोर आले आहे.

भारतीय संघात मोठा बदल! पाटीदार बाहेर, नव्या चेहऱ्याला संधी

महाईन्यूज । वेलिंग्टन

आगामी रायझिंग स्टार्स एशिया कपसाठी निवडण्यात आलेल्या भारत-अ संघात महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. दुखापतींमुळे त्रस्त असलेल्या रजत पाटीदारने, आपण सध्या ५० षटकांच्या सामन्यांच्या स्वरूपात निवडीसाठी उपलब्ध राहू इच्छित नाही, अशी माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) दिली आहे. या निर्णयानंतर त्याला आगामी स्पर्धेसाठीच्या भारत-अ संघातून वगळण्यात आले आहे. त्याच्या जागी युवा खेळाडू आयुष बदोनीचा संघात समावेश करण्यात आला आहे, तर स्फोटक फलंदाज रिंकू सिंहकडे संघाच्या उपकर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली आहे.



संघातील रचनेत नेतृत्वाच्या बाबतीतही एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. निवड समितीने धडाडीचा फलंदाज रिंकू सिंहची भारत-अ संघाच्या उपकर्णधारपदी नियुक्ती केली आहे. या दौऱ्यातही तिलक वर्मा पूर्वीप्रमाणेच संघाचे नेतृत्व सांभाळणार आहे. या संतुलित संघात अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी आणि प्रभसिमरन सिंह यांसारख्या प्रतिभावान खेळाडूंचाही समावेश आहे. तसेच, यष्टिरक्षक फलंदाज म्हणून प्रभसिमरन सिंह आणि कुमार कुशाग्र या दोघांना संघात संधी देण्यात आली आहे.

रायझिंग स्टार्स आशिया कप स्पर्धेसाठी भारतीय 'अ' संघाची घोषणा करण्यात आली असून, या संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी युवा फलंदाज तिलक वर्मा याच्याकडे सोपवण्यात आली आहे. तर रिंकू सिंह याची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. संघात अभिषेक शर्मा आणि युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी यांचाही समावेश करण्यात आला आहे. यष्टीरक्षक म्हणून प्रभसिमरन सिंह आणि कुमार कुशाग्र यांना संधी देण्यात आली आहे. अष्टपैलू खेळाडूंमध्ये सूर्यांश शेडगे, शाहबाज अहमद, विप्रज निगम, हर्ष दुबे, तनुष कोटियन आणि आयुष बदोनी यांचा समावेश आहे. तर वेगवान गोलंदाजीची धुरा हर्षित राणा, प्रिन्स यादव आणि अर्शद खान यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. युवा आणि अनुभवी खेळाडूंचा समतोल साधत निवड समितीने या संघाची बांधणी केली आहे. या स्पर्धेत भारतीय 'अ' संघाला आपली प्रतिभा दाखवण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळणार आहे. आता या स्पर्धेत तिलक वर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ कशी कामगिरी करतो, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

पाटीदारचा मोठा निर्णय

बीसीसीआयने प्रसिद्ध केलेल्या अपडेटनुसार, रजत पाटीदार सध्या त्याच्या जुन्या दुखापतींमधून पूर्णपणे सावरण्यावर आणि तंदुरुस्तीवर लक्ष केंद्रित करत आहे. याच कारणामुळे त्याने ५० षटकांच्या फॉरमॅटसाठी आपल्या नावाचा विचार केला जाऊ नये, अशी विनंती केली होती. पाटीदारच्या या निर्णयानंतर त्याला एसीसी रायझिंग स्टार्स एशिया कपसाठीच्या भारत-अ संघातून बाजूला करण्यात आले आहे. निवड समितीने त्याच्या रिप्लेसमेंट म्हणून आयुष बदोनीला संघात स्थान दिले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY


महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। सोमवार ।
दि. 09 नोव्हेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



दिवाळीत अग्निसुरक्षेसाठी २५० जवान तैनात!

२० अग्निशमन वाहनांसह शहरात गस्त; २२ संवेदनशील ठिकाणांवर विशेष लक्ष

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

दिवाळीत फटाक्यांमुळे आगीच्या दुर्घटना घडू नयेत, यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाने विशेष तयारी केली आहे. शहरात २५० अग्निशमन कर्मचारी तैनात करण्यात आले असून, २० मोठ्या अग्निशमन वाहनांसह अन्य वाहनांद्वारे विविध भागांत गस्त घालण्यात येणार आहे. शहरातील २२ संवेदनशील ठिकाणांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून, आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी अग्निशमन यंत्रणा २४ तास सज्ज ठेवण्यात आली आहे.



मागील वर्षी दिवाळीदरम्यान शहरात आगीच्या सुमारे ७० घटना घडल्या होत्या. या घटनांचा आढावा घेऊन संभाव्य धोकादायक ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. त्यानुसार अग्निशमन विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत. सर्व अधिकारी आणि कर्मचारी दोन शिफ्टमध्ये कार्यरत राहणार असून, दिवाळीच्या कालावधीत कर्मचाऱ्यांच्या रजाही रद्द करण्यात आल्या आहेत.

शगुन चौक, पिंपळे गुरव, अंकुशराव लांडगे नाट्यगृह परिसर, मॅगझिन चौक, त्रिवेणीनगर, तापकीर चौक, चिंचवड लिंक रोड, वाकड, दत्त मंदिर रस्ता, डांगे चौक, जगताप डेअरी, रावेत आणि मुकाई चौक यांसह शहरातील विविध भागांत विशेष गस्त घालण्यात येणार आहे. अग्निशमन केंद्रांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, दुर्घटनेची माहिती मिळताच तातडीने मदत पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अग्निशमन विभागाचे उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांनी दिली.

शहरात १२५ डेसिबलपर्यंत आवाजाची मर्यादा असलेल्या ग्रीन फटाक्यांच्या वापरास परवानगी आहे. प्रतिबंधित फटाक्यांची साठवणूक, वितरण आणि विक्री करताना आढळल्यास कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांनी फटाके फोडताना सुरक्षित अंतर राखावे, ज्वलनशील पदार्थांपासून दूर राहावे तसेच लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. फटाका न फुटल्यास तो पुन्हा पेटवण्याचा प्रयत्न करू नये. फटाके फोडताना जवळ पाण्याची बादली किंवा अग्निसुरक्षेची साधने ठेवावीत, असे आवाहन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

अग्निशमन केंद्रांचे संपर्क क्रमांक : पिंपरी मुख्यालय – ९९२२५०१४७५, भोसरी – ९९२२५०१४७६, प्राधिकरण – ९९२२५०१४७७, रहाटणी – ९९२२५०१४७८, चिखली – ८६६९८९४१०१, तळवडे – ९५५२५२३१०१, थेरगाव – ७०३०९०७९९९, मोशी – ७२६४९४३३३३, चोवीसावाडी – ७७५८९२८१७, नेहरूनगर – ८४८४८८४१०१.

ग्रीन फटाक्यांच्या वापराचे आवाहन

शहरात १२५ डेसिबलपर्यंत आवाजाची मर्यादा असलेल्या ग्रीन फटाक्यांच्या वापरास परवानगी आहे. प्रतिबंधित फटाक्यांची साठवणूक, वितरण आणि विक्री करताना आढळल्यास कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांनी फटाके फोडताना सुरक्षित अंतर राखावे, ज्वलनशील पदार्थांपासून दूर राहावे तसेच लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. फटाका न फुटल्यास तो पुन्हा पेटवण्याचा प्रयत्न करू नये. फटाके फोडताना जवळ पाण्याची बादली किंवा अग्निसुरक्षेची साधने ठेवावीत, असे आवाहन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

दिवाळीच्या झगमगाटात चिमुकल्यांच्या हातात केरसुणी!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

दिवाळी म्हटले की आनंद, उत्साह, रोषणाई आणि खरेदीची लगबग. बाजारपेठांमध्ये नागरिकांची गर्दी वाढली असून, घरोघरी सणाच्या तयारीची धामधूम सुरू आहे. मात्र, या झगमगाटाच्या दुसऱ्या बाजूला रस्त्याच्या कडेला हातात केरसुणी घेऊन विक्री करणाऱ्या चिमुकल्यांचे चित्र मनाला चटका लावणारे आहे. खेळण्या-बागडण्याच्या आणि शाळेत जाण्याच्या वयात या मुलांवर उदरनिर्वाहासाठी वस्तू विकण्याची वेळ आली आहे.



शहरातील विविध रस्त्यांवर आणि बाजारपेठांच्या परिसरात ही मुले केरसुणी विकताना दिसत आहेत. येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना केरसुणी खरेदी करण्याची विनंती करत ही मुले दिवसभर विक्रीसाठी प्रयत्न करतात. एका बाजूला दिवाळीच्या खरेदीसाठी हजारो रुपयांची उलाढाल होत असताना दुसरीकडे चिमुकल्यांना रस्त्यावर उभे राहून वस्तू विकाव्या लागत आहेत. त्यामुळे बालपण, शिक्षण आणि बालकामगारांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

दिवाळीत घराची स्वच्छता आणि सजावटीला विशेष महत्त्व असते. लक्ष्मीपूजनाच्या पार्श्वभूमीवर केरसुणी खरेदी करण्याची परंपरा आजही जपली जाते. मात्र, ज्या केरसुणीला लक्ष्मीचे प्रतीक मानले जाते, तिची विक्री करणाऱ्या या चिमुकल्यांच्या आयुष्यात आनंदाचे दिवस कधी येणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दिवाळी हा केवळ रोषणाई आणि खरेदीचा उत्सव नसून माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचाही सण आहे. अशा लहान विक्रेत्यांकडून वस्तू खरेदी करून त्यांच्या कुटुंबाला हातभार लावता येऊ शकतो. मात्र, त्याचबरोबर या मुलांना शिक्षणाची संधी मिळते का, त्यांची शाळा सुटली आहे का आणि त्यांच्यावर काम करण्याची वेळ का आली आहे, याचाही विचार होणे गरजेचे आहे.

बालपण हे शिक्षण, खेळ आणि आनंद घेण्याचे वय आहे. या वयात मुलांच्या हातात केरसुणीऐवजी पुस्तके आणि लेखणी असायला हवी. त्यासाठी स्थानिक प्रशासन, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी पुढाकार घेऊन या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची गरज आहे. त्यांच्या कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि बालकामगार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. दिवाळीत घराघरांत पणत्या उजळताना या चिमुकल्यांच्या आयुष्यातही शिक्षणाचा प्रकाश पोहोचविण्याची जबाबदारी समाजाने स्वीकारली पाहिजे.

केरसुणीऐवजी हातात हवी पुस्तके!

बालपण हे शिक्षण, खेळ आणि आनंद घेण्याचे वय आहे. या चिमुकल्यांच्या हातात केरसुणीऐवजी पुस्तके, पाटी आणि लेखणी असायला हवी. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रशासन, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. दिवाळीच्या रोषणाईसोबत त्यांच्या आयुष्यातही शिक्षणाचा प्रकाश पोहोचला पाहिजे.

तळेगावच्या २७५ कंत्राटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड!

अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर ८.३३ टक्के बोनस; कर्मचाऱ्यांच्या खात्यांत रक्कम जमा

महाईन्यूज । तळेगाव दाभाडे

तळेगाव दाभाडे नगर परिषदेच्या माध्यमातून कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या सुमारे २७५ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना यंदा दिवाळी बोनस देण्यात आला आहे. एनडीके कंपनीमार्फत कार्यरत असलेल्या या कर्मचाऱ्यांना ८.३३ टक्के बोनस देण्यात आला असून, इंडिके कंपनीच्या माध्यमातून ही रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यांत जमा करण्यात आली आहे. अनेक वर्षांपासून बोनसच्या प्रतीक्षेत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.



नगराध्यक्ष संतोष दाभाडे पाटील आणि आरोग्य समिती सभापती निखिल भगत यांच्या सूचनेनुसार हा निर्णय घेण्यात आला. नगर परिषदेच्या नुकत्याच झालेल्या सभेत शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या स्वच्छता दूतांना दिवाळी बोनस देण्याची मागणी सर्व नगरसेवकांनी केली होती. त्यानुसार प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेत बोनसची रक्कम वितरित केली.

शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी सफाई कर्मचारी, कचरा संकलन कर्मचारी, वाहनचालक तसेच उद्यान विभागातील कर्मचारी ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता नियमितपणे काम करतात. मात्र, अनेक वर्षांपासून त्यांना दिवाळी बोनस मिळत नव्हता. यंदा प्रथमच बोनसची रक्कम थेट बँक खात्यात जमा झाल्याने कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी नगराध्यक्ष संतोष दाभाडे पाटील, गटनेत्या हेमलता खळदे, आरोग्य समिती सभापती निखिल भगत, नगरसेवक विनोद भेगडे, सूरज सातकर, आशा भेगडे, मनीषा म्हाळसकर आदी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांनी नगराध्यक्ष, आरोग्य समिती सभापती आणि सर्व नगरसेवकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. शहराच्या स्वच्छतेसाठी योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांची दिवाळी यंदा बोनसच्या आनंदाने अधिक गोड झाली.

स्वच्छता दूतांच्या मेहनतीला बोनसची साथ!

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना अनेक वर्षांनंतर दिवाळी बोनस मिळाला आहे. ८.३३ टक्के बोनसची रक्कम थेट बँक खात्यात जमा झाल्याने कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. त्यांच्या श्रमांचा सन्मान झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शहर कार्यकारिणी जाहीर

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. पक्षाचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र तायडे यांनी प्रस्तावित केलेल्या २५ पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांना प्रदेशाध्यक्ष रवींद्र पवार यांनी मान्यता दिली आहे. या नियुक्त्यांमुळे शहरातील पक्ष संघटनेला नवी दिशा आणि बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



शहराच्या संघटनात्मक कामकाजाची जबाबदारी विविध पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. शहर सरचिटणीसपदी प्रा. जयंत शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी काशिनाथ जगताप, शकुंतला भाट, प्रशांत कापसे, अनिल भोसले, ॲड. अमोल गव्हाणे, मयूर जाधव, माणिक झेड पाटील, सुनील कस्पटे, सचिन चव्हाणे, ॲड. सोपान पाटील आणि अमोल पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काशिनाथ जगताप यांच्याकडे उपाध्यक्षपदासोबत पक्षाच्या प्रवक्तेपदाचीही जबाबदारी देण्यात आली आहे.



खजिनदारपदी विजयकुमार पिरंगुटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सचिवपदी ॲड. संतोष शिंदे, राजू खंडागळे, विजय बाबर, राहुल धनवडे, संजीवनी पुराणिक आणि नितीन मोरे यांची निवड करण्यात आली आहे. संघटक सचिवपदी द्यानेश अल्हाट, सुनील पवार आणि रणजित आवटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सचिवपदी सुदाम शिंदे, विवेक विधाते आणि प्रमोदिनी लांडगे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र पवार यांच्या मान्यतेनंतर या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. शहरातील पक्ष संघटना अधिक मजबूत करणे, पक्षाचे विचार आणि ध्येयधोरणे नागरिकांपर्यंत पोहोचविणे, तसेच आगामी काळात संघटनात्मक उपक्रमांना गती देणे, अशी जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर राहणार आहे. शहरातील विविध भागांत पक्षाचे संघटनात्मक काम प्रभावीपणे राबविण्यासाठी या कार्यकारिणीच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार आहेत.

देवेंद्र तायडे यांच्या नेतृत्वाला बळ!

शहर जिल्हाध्यक्ष देवेंद्र तायडे यांनी प्रस्तावित केलेल्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांना प्रदेशाध्यक्ष रवींद्र पवार यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे तायडे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील पक्ष संघटनेच्या कामकाजाला गती मिळण्याची अपेक्षा आहे. विविध पदाधिकाऱ्यांवर जबाबदाऱ्या निश्चित झाल्याने संघटनात्मक कामाचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

नव्या चेहऱ्यांना संघटनेत संधी!

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नव्या शहर कार्यकारिणीत विविध पदांवर पदाधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. सरचिटणीस, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, चिटणीस, संघटक सचिव आणि सचिव अशा पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या असून, नव्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून शहरातील पक्षकार्याला गती मिळण्याची अपेक्षा आहे.

पक्ष संघटना बळकट करण्यावर भर!

पिंपरी-चिंचवड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार आहेत. जिल्हाध्यक्ष देवेंद्र तायडे यांच्या नेतृत्वाखाली नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर पक्षाची ध्येयधोरणे नागरिकांपर्यंत पोहोचविणे, स्थानिक प्रश्नांवर आवाज उठविणे आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना संघटनेशी जोडण्याची जबाबदारी राहणार आहे. आगामी राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या नियुक्त्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

Express
Media Enterprises

Professional Live set up with live drone available..

- Documentary
- Weddings
- Drone
- Motion Graphics
- Testimonials
- Tutorial videos
- Product Videos
- Animation
- Social Media Content
- Promotional Videos
- Real Estate
- Corporate
- Advertising
- Events



PUNE

Contact: 9657767000/9370493922/9664188046